# - प्रेस नोट -

दि. १६/०६/२०२६

## कस्तुरबा पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १४/०६/२०२६ रोजी २३.३० वा. च्या सुमारास फिर्यादी प्रमोद बाबुराव सुकाळे वय-४० वर्षे, धंदा - नोकरी, रा. टी. मिरा रोड, ठाणे, हे एचपी पेट्रोलपंप वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, बोरीवली पुर्व, मुंबई येथे सुरु असलेली भांडण सोडवण्याकरिता गेले असता फिर्यादी यांनी अटक आरोपी पुरुष वय-४० वर्षे यास पेट्रोलपंप असल्याकारणाने सिगारेट पिण्यास मनाई केली असता अटक आरोपीने फिर्यादीयांना जिवे मारण्याची धमकी देऊन त्याची मारुती कंपनीची कार ही चालु करून फिर्यादीच्या आंगावर चढवुन कार भरगाव वेगाने चालवत फिर्यादीला बोनेटवर एचपी पेट्रोलपंप, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेने पुढे नेत एमके बेकरी वरुन कार राजेंद्र नगर, दत्तपाडा रोड, बोरीवली पुर्व, मुंबई पर्यंत नेवुन फिर्यादीला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१५/०६/२०२६ रोजी गु.र. क्र.३०७/२६, कलम १०९(१),१२५(ए),२८१ बीएनएस २०२३ सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------